## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १३९ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक १७/०३/२०१८**

**१) हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिंनाक २३/०४/२०१७ चे आज पावेतो. यातील फिर्यादीची मुलगी हिचे लग्नाबाबत साक्षगंधाचा कार्यक्रम आरोपी क्र. १ सोबत झाले असता त्यावेळी आरोपीला फिर्यादीने ४ ग्रॅम सोन्याची अंगठी व नगदी १०,०००/–रु. दिले तरी आरोपी हे लग्नाची तारीख काढण्यास टाळाटाळा करीत होते, त्यावेळी फिर्यादीने आरोपीतांना लग्न काढण्याकरीता बोलावले असता आरोपी क्र. १ ने मला लग्न करीता व धंदया करीता ५,००,०००/–रु. हुन्डा दया नाहीतर मी तुम्हच्या मुली सोबत लग्न करीत नाही असे फिर्यादीस बोलल्याने फिर्यादींचे तोंडी व महिला सहायता कक्ष भंडारा यांचे लेखी अभिप्राया वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४ हुंडा प्रति कायदा १९६१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहनाच्या धडकेत एक गंभिर जखमी. :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील जखमी मारोती गुलाबराव वाट वय ३३ वर्ष, रा. दवडीपार बेला हा कामावरून भंडारा येथुन त्याच्या मोटार सायकलने दवडीपार बेला कडे एनएच ०६ रोडने जात असता, अज्ञात वाहन चालकांने फिर्यादीचे जखमी मोटार सायकल चालक भावाचे मोटार सायकलला धडक देवुन गंभिर जखमी करून घटना स्थळावरुन पळुन गेल्याने, फिर्यादी राजकपुर तुळसीदास वाट वय ३२ वर्ष रा. दवडीपार बेला यांचे तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे -१९.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे मोबाईवर फोन करुन तु नेलेल्या बकऱ्यांचे मटणाचे पैसे दे, म्हणुन मागणी केली असता फिर्यादीचे मुलाने तु नेलेला ७० फुट केबल वायर आणुन दे, व मटणाचे पैसे घेवुन जा असे बोलल्याने आरोपीने फिर्यादीचे घरी अंगणात जावुन फिर्यादीचे पती व मुलास वाईट–वाईट शब्दात शिवीगाळ करुन दगडाने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. उर्मीला दिंगाबर पटले वय ६५ वर्ष, रा. परसोडी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,४४८,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) ट्रॅक्टरच्या धडकेत तीन गंभिर जखमी . :–**

दिंनाक १६/०३/२०१८ चे १२.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर निष्काळजीपणे, लापरवाहीने चालवुन आपल्या साईडने समोरून येत असलेली वेगो दुचाकी क्र. एमएच ३६ क्यु ७०७९ ला समोरून धडक दिल्याने वेगो गाडी चालक भुमेश्वर महादेव हेडावु वय ४७ वर्ष, व त्याची पत्नी सौ. कल्पना वय ४३ वर्ष, व मुलगा यश वय ११ वर्ष, तिन्ही रा. मुंढरी यांना गंभिररित्या जखमी करण्यास कारणाीभुत झाल्याने फिर्यादी नामदेव महादेव हेडावु वय ५९ वर्ष रा. मुंढरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) गैरकायदयाची मंडळी जमवुन शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुनहा नोंद . :–**

दिंनाक १६/०३/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी पुंडलींक नारायण परतेकी वय ४५ वर्ष, रा. पिंपळगाव हे दिनांक १२/०३/२०१८ ला पोस्टे ला दिलेल्या रिपोर्ट संबंधाने बयाण देण्याकरीता पोस्टे हजर झाले व बयाण देवुन मोटार सायकलने गावाकडे परत जात असता यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन हातात काठया घेवुन जखमी यांचे रोड अडवुन शिवीगाळ केली व काठयाने पायावर, उजव्या हातावर व अंगठयाला मारहान केली व पुन्हा रिपोर्ट दिल्यास जिवाने मारण्याची धमकी दिल्याने जखमी फिर्यादीचे प बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३४१,३२४,३२३,५०४,५०६(२)१४१,१४३,१४९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**६) इलेक्ट्रीक करंट लागुन इसमाचा मृत्यु. :–**

दिंनाक १६/०३/२०१८ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील मृतक कारूजी बघाजी सुखदेव वय ६५ वर्ष रा. सोनी हा आपले शेतात गेला असता एमएसईबी पोलचे मेन वायर तुटुन खाली पडल्याने, त्यांना करंट लागुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी मंगेश शालीकराम सुखदेवे वय २८ वर्ष रा. सोनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

**७) ईलेक्ट्रीक करंट लागुन इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक १६/०३/२०१८ चे ०५.०० ते ११.०० वाजता दरम्यान यातील मृतक भिमराव केवळराम तोंडफोडे वय ६२ वर्ष रा. विरसी हा शेतावर मोटार पंप चालु करायला गेला असता ईलेक्ट्रीक शॉक लागुन मरण पवल्याने फिर्यादी रामेश्वर भिमराव तोंडफोडे वय ३७ वर्ष रा. विरसी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**८) ९० टक्के जळाल्याने महिलेचा मृत्यु. :–**

दिंनाक १६/०३/२०१८ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक प्रमीला प्रकाश कुंभरे वय ५५ वर्ष रा. सुरेवाडा पुर्नवसन हिला दोन वर्षपासुन डोक्याचा त्रास होत असल्याने तिचा मानसीक रोग तज्ञ सुहास गजभिये भंडारा यांचे कडे औषधोपचार सुरू होता दि. १२/३/२०१८ रोजी रात्री ०२.०० दरम्यान सुरेवाडा पुर्णवसन येथे स्वत:चे घरी लगवीला जातो म्हणुन घराचे मागे गेली आणी डोक्याचे नेहमीचे त्रासाला कंटाळुन स्वत: अंगावर रॉकेल टाकुन स्वत:ला पेटवुन घेतले, तर दि. १२/३/२०१८ ला चे ०४.२५ वाजता सामान्य रूग्णालय भंडारा येथे औषधोपचारा करीता भरती करण्यात आले, ती ९० टक्के जळाल्याने उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो व फिर्यादी स्वप्नील प्रकाश कुंभरे वय २४ वर्ष रा. सुरेवाडा याचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १६/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१, तीन सिटर वाहनाकरीता ०८ ईतर वाहनांवरती – ७५ केसेस करण्यात आले आहे

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.